# भगवंताची नगरी

# बार्शी दर्शन



## जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर

# बार्शी तालुका



### ★ बार्शी शहर धार्मिक परिचय व ऐतिहासिक तोंडओळख ★



महाराष्ट्राच्या पारमार्थिक क्षेत्रात ज्याप्रमाणे श्री.क्षेत्र पंढरपूराचे स्थान महत्त्वाचे आहे.त्याचप्रमाणे "भगवंताची " बार्शी म्हणून या नगरीचा महिमा वर्णिला जातो. श्री.विष्णुचे "भगवंत या नावाने प्रसिध्द असलेले मंदीर अखिल भारतात फक्त बार्शी नगरीतच आहे. इ.स.१७५९-६० मध्ये श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी इ.स.१७६० मध्ये मंदीराच्या खर्चासाठी सनद दिलेली आढळते.त्यानंतरची सनद १८२३ मध्ये इंग्रजांच्या ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत दिली गेलेली आहे व त्यानंतरची शेवटची सनद १८७४ मध्ये इंग्रज सरकारनेही दिलेली सनद उपलब्ध आहे.त्या सनदेच्या आधारेच श्री.भगवंत देवस्थानचे विश्वस्त मंडळ देवस्थानचा कारभार पहात आहे.साध्वी अहिल्यादेवी होळकर यांनीही अर्थसहाय्य केल्याचे समजते.पौराणिक संदर्भ लक्षात घेता बार्शी नगरीला लाभलेला धार्मिक परंपरेचा धागा आजतागायत भाविक नागरिकांकडून जतन केलेला आढळून येतो.

# श्री.निलकंठेश्वर चिंचोली



बार्शी शहरापासून २२ कि.मी. अंतरावर पांगरी हे गांव असून चिंचोली व पांगरी शिवेवर बार्शी-लातूर रोडवर श्री.निलकंठेश्वराचे मंदीर असून सदरचे मंदीर पुराणकालीन आहे. सतयुगात सिता हरण झाले त्यावेळी श्रीराम व लक्ष्मण सितेचा शोध घेत असताना या ठिकाणाहून जात असताना त्यांनी याठिकाणी निलकंठेश्वराची स्थापना केली व पुढे रामलिंग या गांवी गेले अशी अख्यायिका आहे. मंदीरासमोर निलकंठा नदी वहात असून मंदीराच्या चारही बाजूने पर्वत रांगा आहेत. सदरचे क्षेत्र अत्यंत प्रेक्षणीय असून दर महाशिवरात्री दिवशी एक दिवसाची मोठी यात्रा भरते. त्यावेळी ३० ते ३५ हजार भाविक येतात. तसेच श्रावणी सोमवारी ४० ते ५० हजार भाविक दर्शनासाठी येतात व पुढे रामलिंगच्या दर्शनाला जातात. श्री.निलकंठेश्वराच्या अभिषेकाची आर्थिक तरतूद ब्रिटिश काळापासून ब्रिटीश शासनाने केलेली असून भारत स्वतंत्र झाल्यानंतर ही तरतूद महाराष्ट्र शासनाने पुढे चालू ठेवलेली आहे.

# ★ पुतळा पार्क ★

### ★संपूर्ण महाराष्ट्रात आदर्श संकल्पनेची निर्मिती★




राष्ट्रपुरुषांचे पुतळे प्रेरणा आणि इतिहास ठरण्याऐवजी सर्वत्रच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न बनून राहिले आहेत. यावर नाविण्यपूर्ण पुतळा पार्कची संकल्पना सर्व प्रथम बार्शी नगरपालिकेने राबविण्याचा निर्णय घेतला असून बार्शी शहरामध्ये तहसील कार्यालयासमोरील डॉ.बाबासाहेब आंबडकर उद्यानात हे सदर पुतळा पार्क अस्तित्वात आलेले असून या ठिकाणी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहीर आण्णाभाऊ साठे,शाहिर अमर शेख यांचे पुतळे असून शहराच्या विविध भागातील राष्ट्रपिता महात्मा गांधी,पंडीत जवाहरलाल नेहरु,लोकमान्य टिळक व नगरभुषण काकासाहेब झाडबुके यांचे पुतळे या पुतळा पार्क मध्ये स्थलांतरीत करण्यात आलेले आहेत.

# ★प्रेक्षणीय जैन मंदीर★



बार्शी शहरातील बार्शी-कुर्डूवाडी रोडलगत सुंदर व पवित्र जैन धार्मिक स्थळ श्री.पार्श्वपुरम तीर्थ एक गौरवशाली जैन तीर्थ बनले आहे.भारतातील सर्वप्रथम गौमुख्रीय भूमीवर निर्मित एकमेव अष्टकोनी जैन मंदीर आहे. दरवर्षी २१ ते २९ मार्च व २१ ते २९ सप्टेंबर यावेळी सूर्याची किरणे प्रभू पार्श्वनाथ भगवान यांचे मुख-दर्शन करुन उत्तर-दक्षिण सूर्य प्रस्थान करतो. येथील शिल्पाची विशेषता अशी आहे की, रंगमंडपामध्ये उद्गारीत शब्दांचा प्रतिध्वनी पुन्हा पुन्हा ऐकू येतो. तेथे जैन बांधवांसाठी विश्रामासाठी प्रशस्त धर्मशाळा, जैन भोनशाळा,गुरु-भगवंतासाठी उपाश्रय गृह,थंड पिण्याचे पाण्यासाठी कुलर असलेली पाणपोई,सुंदर बाग-बगीचा-हिरवळ आपले मन येथेच नेहमी येण्यासाठी आकर्षित करते.

# श्री.यमाई देवी कोरफळे





बार्शी शहरापासून ११ कि.मी. अंतरावर कोरफळे हे गांव असून गांवापासून ४ कि.मी. अंतरावर डोंगरावर श्री.यमाई देवीचे मंदीर असून हे मंदीर हेमाडपंथी बांधकाम असून फार पूर्वीपासूनचे आहे.मंदिराचा सभामंडप मोठा असून १० खोल्या आहेत. या मंदीरामध्ये लग्नकार्य होते. तसेच मंदीराच्या शेजारी यमाई तलाव नांवाचा मोठा पाझर तलाव असून सदरचे क्षेत्र प्रेक्षणीय आहे.या ठिकाणी चैत्र महिन्यामध्ये पाच दिवसाची यात्रा पारंपारीक पध्दतीने भरते.या यात्रेच्या वेळी अंदाजे ४० ते ५० हजार भाविक दर्शनासाठी येतात. पहिल्या दिवशी देवीच्या पालखीची मिरवणुक असते. व दुसऱ्या दिवशी कुस्त्यांचा भव्य फड भरतो. महाभारत कालीन कौरव-पांडवांचे युध्द झाले त्यामध्ये कौरवांची हार होऊन त्यांनी आपली शस्त्रे सौंदडाच्या झाडाच्या खाली ठेवून तेथून पळ काढला . त्यामुळे त्या गांवाचे नांव कौरवपळे असे पडले.व कालांतराने त्याचा अपभ्रंश होऊन कोरफळे हे नांव प्रचलित झाले आहे.तसेच श्री.यमाई देवी ही तुळजापूर येथील श्री.तुळजाभवानीची बहिण आहे अशी अख्यायिका आहे.

# ईमु पालन व बगीचा सौंदरे



बार्शी शहरापासून ६ कि.मी. अंतरावर सौंदरे हे गांव असून गांवाबाहेर श्रीमती इंदुबाई रावसाहेब आंधळकर यांनी त्यांचे शेतात ३ एकर क्षेत्रात प्रेक्षणीय बगीचा तयार केलेला असून बगीचामध्ये सर्व प्रकारची रंगीबेरंगी फुलांची झाडेझुडपे आहेत.



तसेच बगीचा मध्ये लहान मुलांना करमणुकीसाठी निरनिराळी खेळण्याची साधने आहेत.बगीचा अत्यंत प्रेक्षणीय असून त्यामध्ये दत्त मंदीर,मारुती मंदीर व नवग्रहांचे मंदीर आहे.



श्रीमती इंदुबाई रावसाहेब आंधळकर यांनी त्यांचे शेतात एक एकर क्षेत्रात ईमु पालन व्यवसाय चालू केलेला असून त्यामध्ये मोठे १०० व लहान ३०० ईमु पक्षी आहेत. पक्षांपासून दररोज २० ते २५ अंडी मिळतात. सदरचे अंडे रु.२२००/- ते ३२००/-पर्यंत विक्री केले जातात.व ईमु पक्षाची नर व मादीची जोडीची किंमत चाळीस ते पंचेचाळीस हजारापर्यंत विकले जातात.

# श्री.यमाई देवी कोरेगांव



बार्शी शहरापासून २६ कि.मी.अंतरावर कोरेगांव हे गांव असून गांवापासून २ कि.मी.अंतरावर बार्शी रोडवर श्री.यमाईदेवी व शामनाथ महाराज यांची मंदीरे असून दोन्ही मंदीराच्या समोर १८९५ सालातील प्राचिन कालीन मोठा तलाव आहे. तलावाच्या कडेला इंग्रजकालीन विश्रामगृह असून सदरचे क्षेत्र प्रेक्षणीय आहे.तलावाच्या सभोवताली डोंगराच्या रांगा असून तलावाच्या पलिकडील बाजूला डोंगरात ज्योतीबाचे मंदीर आहे. श्री.यमाईदेवीची चैत्र महिन्यात तीन दिवसाची यात्रा भरते.तसेच शामनाथ महाराजांची यात्रा दर आमावस्येला भरते. त्यावेळी भजन किर्तनादी कार्यक्रम होतात.या मंदीरास महाराष्ट्र शासनाने तीर्थक्षेत्राचा दर्जा दिलेला आहे. मंदीर परिसरात शासनाच्या निधीतून वाहनतळ व विश्रामगृह बांधलेले आहे.

# श्री.संतनाथ महाराज वैराग



बार्शी शहरापासून २३ किमी अंतरावर वैराग गांव असुन या गांवी श्री सच्चिदानंद संतनाथ महाराजांचे मंदिर असुन मुख्य गांभाऱ्यामध्ये श्री संतनाथ महाराजांची संजीवन समाधी आहे. हे मंदिर सुमारे ८०० ते ९०० वर्षापासुनचे आहे.दर श्रावण महिन्यात ६ दिवसाची यात्रा भरते.या यात्रेस सुमारे ४० हजार भाविक येतात. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी कुस्त्यांचे भव्य फड व रात्री करमणुकीचे कार्यक्रम असतात.

## पर्यटकांसाठी निवास व्यवस्था असणारे शासकीय व खाजगी ठिकाणे

(१) शासकीय विश्रामगृह, लातुर रोड, बार्शी
(२) स्टेटस लॉज, आगळगांव रोड, जयशंकर मिल समोर, बार्शी
(३) चोप्रा पॅलेस, कुर्डूवाडी रोड, बार्शी
(४) गौरी लॉज, कुर्डूवाडी रोड, बार्शी
(५) सुखनिवास लॉज, सोमवार पेठ, बार्शी
(६) सिध्देश्वर लॉज, बस स्टँड समोर, बार्शी